**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५४/२०२०** | **दिनांक ०७/०७/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०१/०७/२०२० ते ०७/०७/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०८/०७/२०१९ सकाळी ८:३० पासून १२/०७/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१/०७ | ०२/०७ | ०३/०७ | ०४/०७ | ०५/०७ | ०६/०७ | ०७/०७ | | ०८/०७ | ०९/०७ | १०/०७ | ११/०७ | १२/०७ |
| ६.२ | ८.० | २७.२ | १४.६ | ११४.८ | ४९.६ | ६५.४ | **पाऊस (मिमी)** | ४२ | ३२ | ३८ | ४४ | ५३ |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३० | ३० | २९ | २९ | २९ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २४ | २३ | २४ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ७ | ६ | ७ | ७ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ९१ | ९१ | ९१ | ९१ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ८८ | ७८ | ७३ | ७७ | ७७ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १६ | १० | ११ | ११ | १२ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | द. | नै.द. | नै.द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| २८५.८ | ६९९.८ | ५१९७.२ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ८ ते १२ जुलै, २०२० दरम्यान रायगड जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे.**

**इशारा: दिनांक ८ ते ११ जुलै २०२० रोजी जिल्ह्यातील तुरळक (१ किंवा २) ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

**विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक १२ ते १८ जुलै २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पुर्नलागवड** | • मध्यम ते जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भात खाचरातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी तसेच लावणीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत भात खाचरात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत. पुर्नलागवड करावयाच्या खाचरामध्ये चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस पाऊसाची तीव्रता कमी असताना एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया, १२५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ३४ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावे. एकरी २ टन गिरीपुष्पाचा पाला चिखलणीच्या वेळीस दिल्यास ५० टक्के नत्र खताची (युरिया) मात्रा कमी करून द्यावी. हळव्या भात जातींसाठी २० ते २१ दिवसांची आणि निमगरव्या व गरव्या जातींसाठी २७ ते ३० दिवसांची तसेच १२ ते १५ सें.मी. उंचीची आणि पाच ते सहा पाने फुटलेल्या रोपांची पुर्नलागवड करावी.<br>• भात पिकाची पुर्नलागवड १५ X १५ सें.मी. (हळव्या जातींसाठी) किंवा २० X १५ सें.मी. (निमगरव्या व गरव्या जातींसाठी) अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत आणि संकरीत भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>• चार सूत्री पध्दतीने लागवड करताना चिखलणीच्या वेळेस एकरी २ टन गिरीपुष्पाचा पाला जमिनीत गाडावा. चार सूत्री पध्दतीने भात पुर्नलागवड करण्यासाठी सुधारित किंवा संकरीत जातींची रोपे वापरून चुडांची नियंत्रित लावणी (१५-२५ सें.मी.) करावी. नियंत्रित लावणी नंतर त्याच दिवशी प्रत्येक चार चुडाच्या चौकोनात २.७ ग्रॅम वजनाची एक युरिया डीएपी ब्रिकेट हाताने ७.५ ते १० सें.मी. खोल खोचावी. |
| **नागली** | **पुर्नलागवड** | • पाऊसाची तीव्रता कमी असताना नागली पिकाची पुर्नलागवडीची कामे हाती घ्यावी. पुर्नलागवडीच्या वेळेस एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया आणि १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट खताची मात्रा फोकून न देता ठोंब्यातून दयावी. रोपे उताराच्या आडव्या दिशेने ठोंबा पध्दतीने उथळ आणि उभी लावावीत. ३० दिवसांची रोपे एका ठोंब्यात दोन या प्रमाणे दोन ओळीत २० सें.मी. आणि दोन रोपात १५ सें.मी. अंतर ठेवून लावावीत. |
| **नारळ/ सुपारी** | **फलधारणा** | • नारळ व सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला पिके** | **लागवड** | • भाजीपाला लागवड केलेल्या क्षेत्रातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **हळद** | **वाढीची अवस्था** | • हळद लागवड केलेल्या क्षेत्रामध्ये अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **फळबाग रोपवाटिका** | **वाढीची अवस्था** | • फळबाग रोपवाटिकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/** | **-** | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच शेड मध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| **शेळ्या** | | • गाभण जनावरांना २.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण आणि ५ ते ७ किलो वाळलेली वैरण तसेच दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण आणि ४ ते ५ किलो वाळलेली वैरण प्रति दिन देण्यात यावी.<br>• पावसाळ्याच्या दिवसात जनावरांमध्ये जंताचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते यावेळी जनावरांना पातळ संडास होणे, खाणे कमी होणे तसेच वजन घटणे अशी लक्षणे दिसून येतात. जंताचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी फेबेंडाझॉल ५ मि. ग्रॅम किंवा अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध देण्यात यावे. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**